INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# विजय तेंडुलकरांच्या 'सखाराम बाईंडर' मधील स्त्री–पुरुष संबंधातील गुंतागुंत

**खगेशकुमार मधुकर सहारे**
संशोधक विद्यार्थी
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली
ईमेल :- khageshsahare@gmail.com
भ्र. क्र. – ७५८८८०६२५२

**डॉ. विजय ह. रैवतकर**
मार्गदर्शक
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य
आरमोरी, जि. गडचिरोली

➢ **सारांश :-**

विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाईंडर' (१९७२) हे नाटक मराठी नाट्यसृष्टीतील एक मैलाचा दगड मानले जाते. तत्कालीन समाजातील नैतिकतेच्या खोट्या कल्पनांना धक्का देणारे हे नाटक प्रामुख्याने स्त्री–पुरुष संबंधांतील गुंतागुंत, नैतिकतेचे प्रश्न, आदिम प्रेरणा, सत्तासंघर्ष आणि समाजातील पितृसत्ताक मानसिकतेचे वास्तववादी व कठोर चित्रण करते. या नाटकात सखाराम, लक्ष्मी आणि चंपा ही प्रमुख पात्रे आहेत. त्यातील मुख्य पात्र असणारा सखाराम समाजाच्या रूढ नैतिकतेला न जुमानता घराबाहेर काढलेल्या किंवा अत्याचार सहन केलेल्या स्त्रियांना आश्रय देतो. मात्र त्यांच्यावर स्वतः तयार केलेले नियम लादतो. त्यामुळे या नाटकात स्त्री–पुरुष संबंधातील संघर्ष, सत्ता, वर्चस्व, शोषण, स्वातंत्र्य आणि भावनिक गुंतागुंत स्पष्टपणे दिसते.

विजय तेंडुलकरांनी या नाटकात समाजाने नाकारलेल्या आणि प्रस्थापित नैतिक चौकटीबाहेर जगणाऱ्या पात्रांच्या माध्यमातून मानवी स्वभाव, आदिम हिंसेची ओढ आणि लिंगाधारित सत्तासंघर्ष यांतील गुंतागुंत मांडली आहे. सखाराम, लक्ष्मी आणि चंपा या तीन प्रमुख पात्रांच्या परस्परसंबंधांतून निर्माण होणारा तणाव, शोषणाचे स्वरूप, सामाजिक वास्तव, मानवी अपरिहार्यता आणि हिंसेचा शोध घेणे हा या शोधपत्रिकेचा मुख्य उद्देश आहे. सोबतच समाजातील लैंगिक असमानता, सत्ता संबंध, नैतिक मूल्ये आणि मानवी स्वभावातील विरोधाभास या सर्व घटकांचा अभ्यास करून नाटकातील स्त्री–पुरुष संबंधांचे विविध पैलू विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यासले आहेत.

➢ **बीजशब्द :-** सखाराम बाईंडर, विजय तेंडुलकर, स्त्री–पुरुष संबंध, वास्तववाद, लैंगिक राजकारण, सत्तासंघर्ष, पुरुषसत्ताक पद्धती, मानवी प्रवृत्ती, शोषण, सामाजिक नैतिकता.

➢ **प्रस्तावना :-**

आधुनिक मराठी नाट्य साहित्य व मराठी रंगभूमीवरील एक धाडसी, प्रयोगशील आणि वास्तववादी नाटककार म्हणून विजय तेंडुलकर यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या नाटकांमध्ये समाजातील वास्तववादी आणि धक्कादायक पैलू स्पष्टपणे मांडलेले दिसतात. त्यांनी आपल्या अनेक नाटकांमधून सामाजिक वास्तवाचे अत्यंत प्रभावी आणि निर्भीड चित्रण केले आहे. सोबतच माणसाच्या सहजप्रवृत्तींचा

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

आणि समाजातील विसंगतींचा उग्र वेध घेतला आहे. त्यांच्या नाटकांमध्ये मानवी स्वभावातील विरोधाभास, सामाजिक अन्याय आणि नैतिकतेची गुंतागुंत यांचे सखोल विश्लेषण दिसून येते.

नाटककार विजय तेंडुलकर यांचे 'सखाराम बाईंडर' हे नाटक १९७० च्या दशकात लिहिले गेले. हे नाटक मराठी रंगभूमीच्या इतिहातील एक अत्यंत खळबळजनक, वादग्रस्त, मात्र तेवढेच वास्तववादी नाटक मानले जाते. त्या काळात त्यावर मोठा वाद निर्माण झाला होता. कारण या नाटकात घरगुती हिंसाचार, स्त्री–पुरुषांतील सत्तासंबंध, लैंगिकता आणि समाजातील दांभिक नैतिकता यांचे उघड आणि वास्तववादी चित्रण करण्यात आले आहे. या नाटकाने मध्यमवर्गीय नीतिमत्तेला मोठे आव्हान दिले. कारण विजय तेंडुलकरांनी या नाटकातून लग्नासारख्या पवित्र मानल्या जाणाऱ्या संस्थेला छेद देऊन, 'करार' पद्धतीच्या नात्यावर प्रकाश टाकलेला आहे. मुळात या नाटकात सखाराम हा नायक नसून तो एक विद्रोही प्रवृत्ती आहे, जो समाजाच्या दांभिकपणावर प्रहार करतो. मात्र त्याच्या स्वतःच्या घरातील स्त्री–पुरुष संबंध हे तितकेच गुंतागुंतीचे आणि शोषणावर आधारित आहेत.

सखाराम हा नाटकाचा नायक स्वतःच्या नियमांनुसार जीवन जगणारा, समाजाच्या पारंपरिक नैतिकतेला आव्हान देणारा व्यक्ती आहे. तो समाजाने टाकून दिलेल्या स्त्रियांना आपल्या घरी आश्रय देतो, पण त्याचवेळी त्या स्त्रियांचा उपयोगही करतो. त्यामुळे त्याच्या संबंधांमध्ये प्रेम, स्वार्थ, सत्ता आणि हिंसा या सर्वांचा गुंता दिसून येतो. मुळात विजय तेंडुलकरांनी या नाटकाच्या माध्यमातून समाजातील मध्यमवर्गीय मुखवटा बाजूला सारून मानवी जीवनातील नग्न सत्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या नाटकातील सखाराम हा असा पुरुष आहे की, जो लग्नाच्या बंधनाला नाकारतो, पण स्वतःचे स्वतंत्र नियम तयार करुन एक 'कौटुंबिक' मॉडेल उभे करतो. या नाटकात स्त्री–पुरुष संबंध केवळ प्रेम किंवा आकर्षणावर आधारित नसून ते केवळ 'गरज' आणि 'सत्ता' यावर अधिष्ठित आहेत.

आधुनिक मराठी नाटकांच्या परंपरेत विजय तेंडुलकर यांचे नाव अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी समाजातील वास्तव, दांभिकता, हिंसा आणि सत्तासंबंध यांचे अत्यंत प्रभावी चित्रण आपल्या नाटकांत केले आहे. त्यांच्या नाटकांमध्ये मानवी मनातील गुंतागुंत आणि सामाजिक विसंगती प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळेच या शोधपत्रिकेत 'सखाराम बाईंडर' मधील स्त्री–पुरुष संबंधांचा अभ्यास करून त्यातील सामाजिक वास्तव आणि स्त्रीच्या स्थानाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सोबतच लग्नाच्या चौकटीबाहेर राहूनही सखाराम ज्या प्रकारे स्त्रियांना आपल्या घरात 'हक्काने' ठेवतो, त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत या शोधपत्रिकेचा मुख्य विषय आहे.

## ➢ नाटकाची पार्श्वभूमी :–

'सखाराम बाईंडर' हे नाटक समाजातील दांभिक नैतिकतेवर प्रखर टीका करणारे आहे. सखाराम हा पुस्तक बांधणीचे काम करणारा माणूस असून तो समाजाने टाकून दिलेल्या विवाहित स्त्रियांना आपल्या घरी ठेवतो. तो या स्त्रियांना आश्रय देतो, पण त्या मोबदल्यात त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवतो. हे संबंध विवाहाच्या चौकटीबाहेरचे असल्यामुळे समाज त्याला अनैतिक समजतो. मात्र विजय तेंडुलकरांनी या माध्यमातून समाजातील दुटप्पी नैतिकतेवर प्रश्न उपस्थित केला आहे.

## ➢ नाटकातील स्त्री–पुरुष संबंधातील गुंतागुंत :–

**१) सखारामचे व्यक्तिमत्त्व आणि स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी :-**

विजय तेंडुलकरांच्या 'सखाराम बाईंडर' या नाटकातील सखाराम हा स्वतःला प्रामाणिक मानत असला, तरी तो व्यवस्थेसंदर्भात बंडखोर आहे. तो निराधार स्त्रियांना आपल्या घरात आश्रय देतो, पण त्या बदल्यात त्यांच्याकडून घरकाम आणि शरीरसुखाची अपेक्षा ठेवतो. त्याच्या मते, तो स्त्रियांना 'बाईंडर' म्हणजेच एकत्र बांधणारा आहे. पण प्रत्यक्षात तो त्यांच्यावर मालकी हक्क गाजवतो. सखारामच्या घरात पुरुष हाच सत्तेचा केंद्रबिंदू आहे, जो स्वतःचे नियम स्वतः बनवतो.

या नाटकातील सखाराम हा समाजाच्या नियमांना न जुमानणारा आणि स्वतःचे नियम बनवणारा व्यक्तिमत्त्व आहे. त्याच्या मते, हा एक 'करार' वा 'प्रामाणिक व्यवहार' आहे. येथे स्त्री ही केवळ एक वस्तू किंवा उपभोग्य साधन म्हणून पाहिली गेली आहे. येथे स्त्री-पुरुष संबंधात भावनिकतेपेक्षा व्यवहाराला अधिक महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे त्याचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा मालकीभाव आणि उपयोगितेवर आधारित असल्याचे दिसते.

**२) सखाराम आणि लक्ष्मी :-**

या नाटकात लक्ष्मी ही सहनशील स्वभावाची स्त्री आहे. ती सोशिक, धार्मिक आणि परंपरागत संस्कारात वाढलेली आहे. म्हणूनच सखारामच्या शिवीगाळीत आणि मारहाणीतही ती आपले स्वत:चे 'स्त्रीत्व' आणि 'घरपण' शोधते. ती सखारामच्या घरात राहते आणि त्याच्या सर्व आज्ञा पाळते. तिच्या स्वभावात समर्पण आणि सहनशीलता दिसून येते. लक्ष्मी आणि सखाराम यांच्यातील संबंध हे एकतर्फी सत्तेवर आधारित आहेत. सखाराम हा घरातील सर्व निर्णय घेणारा व्यक्ती आहे, तर लक्ष्मी त्याच्या अधीन राहते. त्यामुळे या संबंधांमध्ये स्त्रीची असहाय्यता आणि पितृसत्ताक समाजव्यवस्था स्पष्टपणे दिसते. येथे संबंधांचे स्वरूप 'स्वामी आणि दासी' असे आहे. जिथे स्त्रीचे अस्तित्व पूर्णपणे पुरुषाच्या मर्जीवर अवलंबून आहे.

**३) सखाराम आणि चंपा :-**

या नाटकातील चंपा ही लक्ष्मीपेक्षा पूर्णपणे भिन्न स्वभावाची स्त्री आहे. ती स्वाभिमानी, बंडखोर, निर्भीड, स्वतंत्र विचारांची आणि स्वतःच्या लैंगिकतेबाबत स्पष्ट आहे. ती स्वतःच्या देहावर स्वतःचा हक्क सांगणारी आहे. चंपाच्या येण्याने सखारामचा 'पुरुषी अहंकार' डळमळीत होतो. कारण सखारामला चंपावर सत्ता गाजवता येत नाही. चंपा सखारामच्या अधिकाराला सहज मान्य करत नाही. म्हणूनच तो तिच्या शारीरिक ओढीने हतबल होतो. त्यामुळे तिच्या आणि सखारामच्या संबंधामध्ये सतत संघर्ष निर्माण होतो. या संघर्षातून स्त्री-पुरुष संबंधातील सत्ता आणि स्वातंत्र्य यांचा संघर्ष दिसून येतो.

**४) हिंसा, सत्ता आणि लैंगिक राजकारण :-**

या नाटकात स्त्री-पुरुष संबंध हे केवळ प्रेम किंवा भावनिक नाते म्हणून दाखवलेले नाहीत. त्यामध्ये हिंसा, सत्ता, नियंत्रण आणि लैंगिक राजकारण यांचा प्रभाव दिसतो. सखाराम स्त्रियांना आश्रय देतो, पण त्याचवेळी तो त्यांच्यावर नियंत्रणही ठेवतो. त्यामुळे या नाटकातील स्त्री-पुरुष संबंध हे समानतेवर आधारित नसून सत्तेच्या असमतोलावर आधारित आहेत. या नाटकातील स्त्री-पुरुष संबंधांच्या मुळाशी 'हिंसा' ही एक महत्त्वाची प्रवृत्ती आहे. सखारामची पुरुषी आक्रमकता आणि चंपाची बेधडक वृत्ती यांचा संघर्ष शेवटी

हत्येमध्ये रूपांतरित होतो. म्हणूनच हे संबंध नैसर्गिक ओढीपेक्षा संघर्षाचे आणि अस्तित्वाच्या लढाईचे अधिक वाटतात.

**५) लक्ष्मी आणि चंपा : दोन टोकांची व्यक्तिमत्त्वे :-**

या नाटकातील स्त्री-पुरुष संबंधांतील गुंतागुंतीचे वेगवेगळे पैलू लक्ष्मी आणि चंपा या दोन परस्परविरोधी स्त्री व्यक्तिरेखांतून स्पष्ट होतात. लक्ष्मी ही स्वभावाने ईश्वरावर श्रद्धा ठेवणारी, मवाळ, सोशिक, सहनशील, धार्मिक, सत्त्वगुणी आणि नम्र स्वभावाची स्त्री आहे. ती सखारामच्या मारहाणीला नशिबाचा भाग मानते आणि त्याचे अत्याचार सहन करते. सखारामला मात्र तिच्या मवाळपणाचा कंटाळा येतो.

याउलट चंपा ही स्वभावाने कशाचीही तमा न बाळगणारी, स्वाभिमानी, स्पष्टवक्ती, आक्रमक आणि बंडखोर स्वभावाची स्त्री आहे. ती सखारामच्या वर्चस्वाला विरोध करते. ती सखारामच्या पुरुषी अहंकाराला चोख प्रत्युत्तर देते. सखाराम तिच्या सौंदर्याच्या आणि व्यक्तिमत्वाच्या जाळ्यात अडकतो.

या नाटकातील या दोन व्यक्तिरेखांमुळे स्त्रियांच्या विविध मानसिकता आणि त्यांच्या संघर्षाचे चित्र स्पष्ट होते.

**६) समाजातील नैतिकतेचा प्रश्न :-**

विजय तेंडुलकरांनी या नाटकाच्या माध्यमातून समाजातील नैतिकतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. समाज बाह्यतः नैतिकतेची भाषा बोलतो, पण प्रत्यक्षात स्त्रियांच्या शोषणाकडे दुर्लक्ष करतो. या नाटकातील सखारामचे वर्तन हे उघडपणे अनैतिक वाटत असले, तरी समाजातील अनेक संबंध लपवलेल्या स्वरूपात याच प्रकारचे असतात. त्यामुळेच लेखकाने समाजातील हीच दांभिकता येथे उघड केली आहे. सखाराम समाजातील ढोंगी नैतिकतेचा तिरस्कार करतो, पण स्वतःच्या घरात तो त्याच जुन्या पितृसत्ताक पद्धतीचा अवलंब करतो. चंपाच्या हत्येनंतर लक्ष्मी ज्या प्रकारे सखारामला वाचवण्यासाठी पुढे येते, त्यातून स्त्रियांच्या मानसिक गुलामगिरीची आणि अस्तित्वाच्या लढाईची एक नवी गुंतागुंत समोर येते.

**७) संबंधांमधील सत्तासंघर्ष आणि हिंसेचे स्वरूप :-**

विजय तेंडुलकरांनी या नाटकाच्या माध्यमाने दाखवून दिले आहे की, स्त्री-पुरुष संबंध केवळ प्रेमावर आधारित नसून ते 'पॉवर प्ले' वर आधारलेले असतात. सखाराम चंपावर आपला ताबा मिळवू पाहतो, पण चंपा त्याला जुमानत नाही. जेव्हा सखारामला समजते की, चंपाचे दौलतशी संबंध आहेत. तेव्हा त्याचा पुरुषी अहंकार दुखावला जातो. नाटकाच्या शेवटी सखाराम चंपाची हत्या करतो. हा टोकाचा हिंसाचार स्त्रीवर नियंत्रण मिळवण्याच्या पुरुषी मानसिकतेचा पराभव आणि विकृती दोन्ही दर्शवतो.

**८) नाटकाचे सामाजिक महत्त्व :-**

'सखाराम बाईंडर' हे नाटक केवळ एका व्यक्तीची कथा नसून समाजातील स्त्रियांची स्थिती आणि पुरुषसत्ताक मानसिकता यांचे प्रतिबिंब आहे. या नाटकाने मराठी रंगभूमीवर मोठा वाद निर्माण केला.

कारण त्यामध्ये समाजातील लैंगिक आणि नैतिक प्रश्न उघडपणे मांडले गेले आहेत. त्यामुळे हे नाटक आधुनिक मराठी नाटकातील एक महत्त्वाचा टप्पा ठरले.

विजय तेंडुलकर यांच्या नाटकांमध्ये मानवी स्वभावातील गुंतागुंत आणि सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांच्या 'सखाराम बाईंडर' या नाटकामध्ये स्त्री-पुरुष संबंधांचे अत्यंत वास्तववादी, धाडसी आणि बहुआयामी चित्रण केले आहे. सखाराम, लक्ष्मी आणि चंपा यांच्या माध्यमातून त्यांनी सत्ता, प्रेम, स्वातंत्र्य आणि नैतिकतेतील संघर्ष दाखवला आहे. लेखकाने समाजातील दांभिक नैतिकतेवर प्रहार करत स्त्रीच्या शोषणाचा प्रश्न मांडला आहे. या नाटकातील व्यक्तिरेखा समाजातील वास्तव परिस्थितीचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे हे नाटक केवळ मनोरंजनासाठी नसून समाजाला विचार करायला भाग पाडणारे आहे.

## ➢ समारोप :-

थोडक्यात सांगायचे तर, विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाईंडर' हे नाटक मानवी मनातील आदिम आणि हिंस्र प्रवृत्तींचा आरसा आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यातील सत्तासंघर्ष, एकमेकांवरील अवलंबित्व आणि समाजाचा दुटप्पीपणा या सर्वांचा हा एक दाहक दस्तऐवज आहे. सामाजिक संकेत झुगारूनही मानवी भावनांचे गुंते सुटण्याऐवजी अधिक क्लिष्ट होतात, हेच या नाटकाचे मर्म आहे. विजय तेंडुलकरांनी या नाटकाच्या माध्यमाने अत्यंत निर्भीडपणे स्त्री-पुरुष संबंधांतील 'करारी' वास्तव जगासमोर मांडले आहे, जे आजही तितकेच समर्पक वाटते.

## ➢ निष्कर्ष :-

१) 'सखाराम बाईंडर' या नाटकात स्त्री-पुरुष संबंधांतील सत्ता, वर्चस्व आणि शोषण यांचे वास्तववादी चित्रण केले आहे.
२) लक्ष्मी आणि चंपा या व्यक्तिरेखांद्वारे स्त्रियांच्या विविध मानसिकता आणि त्यांच्या संघर्षाचे चित्रण केले आहे.
३) स्त्री-पुरुष संबंधांमध्ये सत्ता आणि लैंगिक राजकारण महत्त्वाची भूमिका बजावतात.
४) 'सखाराम बाईंडर' हे नाटक मानवी स्वभावधर्मातील हिंस्त्र आणि आदिम प्रवृत्तींचे दर्शन घडवते.
५) या नाटकात स्त्री-पुरुष संबंध हे केवळ शारीरिक नसून त्यात सामाजिक असुरक्षितता, वर्चस्ववाद आणि परावलंबित्व यांचे क्लिष्ट जाळे असते हे अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.
६) सखाराम या पात्राच्या माध्यमातून लेखकाने पुरुषप्रधान समाजाची मानसिकता उघड केली आहे. तसेच पितृसत्ताक समाजव्यवस्थेवर तीव्र टीका केलेली आहे.
७) हे नाटक आधुनिक मराठी नाट्यसाहित्यातील एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी साहित्यकृती आहे.

## ➢ संदर्भग्रंथ :-

१) तेंडुलकर विजय, 'सखाराम बाईंडर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, २००३.
२) बर्वे चंद्रशेखर, 'तेंडुलकरांची नाटके', राजहंस प्रकाशन, पुणे, १९८५.

३) सारंग कमलाकर, 'बाइंडरचे दिवस', दुसरी आवृत्ती, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २५ डिसेंबर १९९९.

४) दावतर वसंत, 'तेंडुलकरांची नाट्यप्रतिभा', लोकवाङ्मय गृह, मुंबई, जानेवारी २००३.

५) गोखले शशिकांत, 'विजय तेंडुलकर यांच्या नाटकांचा अभ्यास', मराठी मंदिर प्रकाशन, मुंबई.

६) कुलकर्णी दीपक, 'आधुनिक मराठी नाटक : प्रवाह आणि परिवर्तन', मॅजेस्टिक प्रकाशन.

७) देशपांडे ग. प्र., 'आधुनिक मराठी नाटक : बदलते स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

८) देशपांडे शं. गो., 'विजय तेंडुलकर : एक अभ्यास', मॅजेस्टिक प्रकाशन.

९) आपटे वसंती, 'मराठी नाटकातील स्त्री – चित्रण', प्रतिमा प्रकाशन.

१०) वाडकर विजया, 'तेंडुलकरांची नाटके : स्वरूप आणि समीक्षा', प्रतिमा प्रकाशन.